पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक : ०१/०८/२०२३

## नाशिक ग्रामीण पोलीसांचे गुटखा विरोधी 'अभियान - २' संपन्न
## ६० गुन्हे दाखल, ७३ लाखांचा गुटखा जप्त

---

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मानवी आरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू तसेच मानवी आरोग्यास हानीकारक असणा-या खाद्यपदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक आदी व्यावसायांना प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांनी जिल्हा अंतर्गत गुटख्याची अवैधरित्या वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द गुटखा विरोधी अभियान सुरू केलेले आहे.

दिनांक ०६/०६/२०२३ ते ३०/०६/२०२३ रोजी पावेतो नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटखाविरोधी 'अभियान - १' राबविले होते. सदर अभियानादरम्यान जिल्हयातील गुटखा विक्रीची केंद्रे, पुरवठादार व वाहतुकदार यांच्या साखळीवर कारवाई करण्यात पोलीसांना भरीव यश मिळाले होते.

सदर कामगिरीनंतर दिनांक ०६/०७/२०२३ ते ३१/०७/२०२३ या दरम्यान पुन्हा गुटखाविरोधी 'अभियान - २' राबविण्यात आले. या दरम्यान गुटखा विक्री व वाहतूक करणा-या आणखी इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे दोन्ही गुटखाविरोधी अभियानादरम्यान केलेल्या कारवाईची माहीती खालीलप्रमाणे :

**नाशिक ग्रामीण पोलीसांचे गुटखा विरोधी अभियान**

| अभियान | दिनांक | दाखल केसेस | आरोपी संख्या | मुद्देमाल |
|---|---|---|---|---|
| अभियान - १ | ०६ ते ३०/०६/२०२३ | १०९ | ११५ | १,३६,०६,७८५ |
| अभियान - २ | ०६ ते ३१/०७/२०२३ | ६० | ६३ | ७२,८६,१५२ |
| **एकुण** | | **१६९** | **१७८** | **२,०८,९२,९३७/-** |

नाशिक ग्रामीण पोलीसांनी आजवर केलेल्या कारवाई दरम्यान एकूण (१७८) आरोपी अटक करण्यात आले. त्यातील (३७) आरोपी आजही जेलमध्ये असून आणखी (०७) आरोपी पोलीस कोठडीत आहेत.

नाशिक ग्रामीण घटकातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांची ०८ पथके कार्यरत असून त्यांचेकडून, तसेच स्थानिक पोलीस स्टेशनकडून सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांवर कारवाई करण्यात येत आहे. जिल्हयातील राज्य व राष्ट्रीय महामार्गावर होणारी गुटख्याची वाहतूक तसेच पोलीस ठाणे हद्दीतील पान टप-या, गोडाऊन व इतर आस्थापनांची कसून तपासणी करण्यात येत असून सदरचे अभियान यापुढेही सुरू राहणार आहे.

गुटखा, पान मसाला व इतर प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थांविषयी नागरीकांना काही माहीती असल्यास, नाशिक ग्रामीण पोलीसांच्या हेल्पलाईन क्रमांक **६२६२ २५ ६३६३** या क्रमांकावर सपंर्क साधून नाशिक ग्रामीण पोलीसांनी सुरू केलेल्या अभियानास हातभर लावावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.